Vol 6 Issue 5 March 2015 ISSN No :2231-5063

# International Multidisciplinary Research Journal

# Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

**Welcome to GRT**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2231-5063**

Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.


## Regional Editor

Dr. T. Manichander

## *International Advisory Board*

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University


**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.aygrt.isrj.org**

Golden Research Thoughts
ISSN 2231-5063
Impact Factor : 3.4052(UIF)
Volume-4 | Issue-9 | March-2015
Available online at www.aygrt.isrj.org

GRT

# भारतातील अस्पृश्य समाजाची स्थिती : जाती वास्तव

**प्रा. डॉ. सुजाता सुधीर गायकवाड**

विद्यावर्धिनी महाविद्यालय, धुळे.

## प्रास्ताविक

स्वातंत्र्यपूर्व काळातील अस्पृश्य समाजाची दयनीय अवस्था हा एक ज्वलंत असा प्रश्न होता. कारण आपल्या देशातील सुमारे आठ कोटी लोकांचे स्वास्थ्य, सुरक्षितता आणि आशा–आकांक्षा त्यात गुंतलेल्या होत्या. येथील लोकशाही व्यवस्थेचे भवितव्य या प्रश्नांच्या सोडवणुकीवरच अवलंबून होते. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर मानवाची प्रतिष्ठा, समता, सामाजिक न्याय आणि बंधुत्व या तत्त्वांवर संविधानाची आखणी करण्यात आली. लोकसत्ताक संघराज्यात जाती, धर्म आणि भाषा यांच्या भेदभावास थारा न देता सर्व नागरिकांना सारखेच अधिकार देण्यात आले. दलितांचा मागासलेपणा नाहीसा करून त्यांना इतर वर्गांच्या बरोबरीने आणण्याचा प्रयत्न करणे हे शासकीय धोरणाचे मार्गदर्शक तत्त्व म्हणून स्वीकारण्यात आले. सार्वजनिक ठिकाणी अस्पृश्यता पाळणे हा गुन्हा ठरविण्यात येवून तसे कायदे लोकसभेने मंजूर केलेत. असे असले तरी राष्ट्रीय नेत्यांनी दलितांना दिलेली आश्वासने आणि पूर्तता यात अद्यापही फार मोठी तफावत आहे. स्वातंत्र्य प्राप्तीला आज 70 वर्षे होण्यात आली तरीही अस्पृश्यता कायम असल्याचे दिसते. आपल्या देशात आर्थिक, शैक्षणिक व सामाजिकदृष्ट्या मागासलेले अनेक गट असले तरी अस्पृश्य समाज हा अधिक जागृत व संघटित असा गट आहे. राजकीय हक्कांसाठी संघटना उदयास आल्यात. शैक्षणिक प्रगतीचा विधायक परिणाम बरोबर म्हणून प्रशासकीय, राजकीय, साहित्यिक व इतर महत्त्वाच्या ठिकाणी अस्पृश्य तरुणांचा सहभाग महत्त्वाचा ठरत आहे.

## भारतातील अस्पृश्यता

आपल्या देशात पूर्वी अस्पृश्यांची परिस्थिती अत्यंत दयनीय स्वरुपाची होती. अस्पृश्यांना गावाबाहेर रहावे लागत होते. कुत्रे आणि गाढवे हीच त्यांची धन–संपत्ती होती. प्रेतावरील वस्त्रे त्यांना परिधान करावी लागत. तसेच फुटक्या भांड्यामध्ये जेवण करावे. कंकणादी अलंकरांचा वापर करून नेहमीच फिरते रहावे. धर्मानुष्ठाणाप्रसंगी अस्पृश्यांचे तोंड पहाणे अशुभ मानले जाई. सर्व सामाजिक व आर्थिक व्यवहार हे सजातीच करावेत. गावांमध्ये किंवा नगरामध्ये फिरु दिले जात नव्हते.[1] अशी वाईट अवस्था भारतातील अस्पृश्यांची स्वातंत्र्यपूर्व काळात होती.

## अन्त्यज अस्पृश्य

येथील अस्पृश्यांना अन्त्यः, अन्त्यज आणि अत्यंवासी अशी नावे हिंदू शास्त्रांनी दिली होती. ही नावे अत्यंत पुरातन काळापासून हेटाळणीपूर्वक वापरली जात होती. अन्त्य या शब्दाचा अर्थ जो शेवटी जन्माला आला तो असा हिंदू शास्त्राकार सांगतात. तसेच परमेश्वराने जेव्हा मानवीजात निर्माण केली तेव्हा अस्पृश्यांना सर्वात शेवटी निर्माण केले असाही अर्थ शास्त्रपारंगतांकडून सांगितला जातो. मात्र हा युक्तीवाद हास्यास्पद असून हिंदू धर्मशास्त्रांनी सांगितलेल्या उत्पत्तीच्या क्रमाशीही जुळणारा नाही. कारण हिंदू शास्त्राप्रमाणे शेवटी जन्माला आलेला शुद्र होय. अस्पृश्य हा निर्मितीच्या योजनापलिकडील प्राणी आहे. सृष्टीरचनेच्या बाबतीत प्रथम कोण व शेवटचा कोण हा क्रम अस्पृश्याला लागू होत नाही आणि लागू केलाही जाऊ शकत नाही.[2]

अन्त्य या शब्दाचा अर्थ निर्मितीच्या शेवटचा नसून गावच्या शेवटचा असा आहे. गावाच्या परकोटच्या बाहेर जे लोक रहात होते त्यांना दिलेले हे नाव आहे. ही बाब असे सांगते की, भुतकाळाच्या मध्ये एका भागात काही लोक गावामध्ये व काही गावाच्या बाहेर राहत असत. हे लोक गावाच्याबाहेर म्हणजे गावाच्या अंत्य भागात राहत असत त्यांना अंत्य किंवा अंत्यज म्हणण्यात येत असे.

अंत्यजांचे 52 हक्क 'अत्यंज' आणि 'अंत्यवासी' या शब्दाचे दुहेरी महत्त्व आहे. वेगळ्या मोहल्ल्यामध्ये त्यांचे राहणे ही एक अशी विशिष्ट घटना होती कि, ती व्यक्त करण्यासाठी एक नवीन संज्ञा निर्माण करावी लागली. तसेच हे लोक परके होते अशी ही

संकल्पना यातून व्यक्त केली जाऊ शकते. अस्पृश्य हे वाताहत झालेले लोक होते. हे दर्शविणाऱ्या पुराव्यांचा दुसरा गट महार नावाच्या जमातीशी संबंधित आहे. ''महार ही जमात महाराष्ट्रातील एक प्रमुख जमात आहे. महाराष्ट्रामध्ये आढळणाऱ्या अस्पृश्य जमातीतील ही सर्वात मोठी जमात आहे. स्पृश्य हिंदू आणि महार यांचे संबंध खालील बाबींवरूनही दर्शविता येतात. प्रत्येक गावांमध्ये महार लोक असतात. त्यांची वस्ती गावकूसाबाहेर असते. गावाच्या वतीने खेड्याची निगरानी राखण्याचे काम महार करीत असतात. या मोबदल्यात हिंदू गावकऱ्यांकडून महारांना 52 प्रकारचे हक्क मिळालेले होते. त्यात गावकऱ्यांकडून अन्न गोळा करणे, हंगामात धान्य गोळा करणे, गावातील मेलेल्या जनावरांची विल्हेवाट लावणे असे हक्क होते.

महारांमध्ये वंशपरंपरागत अशी समजूत आहे की, गावकऱ्यांकडून त्यांना जे 52 हक्क मिळालेले आहेत ते बेदरच्या मुसलमान राजाने दिलेले आहेत. याचा अर्थ इतकाच की, हे हक्क अत्यंत पुरातन आहेत आणि बेदरच्या मुसलमान राजाने त्याला केवळ मान्यता दिली जोती.[3]

### अशुद्ध आणि अस्पृश्य

अस्पृश्यता केव्हा अस्तित्वात आली ? अस्पृश्यतेचा उगम अतिप्राचीन काळी झाला, असा सनातनी हिंदूंचा आग्रह आहे व अलिकडच्या स्मृतींमध्येच नव्हे तर पूर्वी पासूनच धर्मसूत्रांमध्ये तसे आदेशच दिले आहेत आणि ही धर्मसूत्रे तपासून पहाणे आवश्यक ठरते. आज आपण 'अस्पृश्यता' या शब्दाचा जो अर्थ होतो तोच त्यांना अभिप्रेत होता काय ? आज आपण ज्या अर्थाने एका वर्गासाठी अस्पृश्य हा शब्द वापरतो त्याच वर्गासाठी धर्मसूत्रेसुद्धा अस्पृश्य हा शब्द वापरीत होते काय ?

धर्मसूत्रांचे परिक्षण केल्यास असे निर्विवादपणे आढळून येते की ते एका वर्गाला अस्पृश्य असे म्हणतात. या अस्पृश्य शब्दाचा अर्थही स्पर्श करण्यास अयोग्य असाच आहे याबद्दल शंकाच नाही. तरीसुद्धा धर्मसूत्रांमध्ये उल्लेख आलेले अस्पृश्य व आधुनिक भारतातील अस्पृश्य हे एकच आहेत की नाही हा प्रश्न शिल्लक राहतोच. धर्मसूत्रांमध्ये अस्पृश्य या शब्दाशिवाय 'अंत्य, अंत्यज, अंत्यवासी आणि बाह्य' हे शब्दही वापरलेले आहेत हे लक्षात घेतले म्हणजे वरील प्रश्नाला अधिकच महत्त्व प्राप्त होते. हेच शब्द नंतरच्या काळातील स्मृतींनीही वापरलेले आहेत.

या बाबींचा चिकित्सक अभ्यास केला असता अस्पृश्यांमध्ये कोण–कोणत्या जातींचा समावेश होतो हे समजावून घेण्यासाठी धर्मसूत्रांनी किंवा स्मृतींची मदत होवू शकत नाही. त्याचप्रमाणे 'अत्यंवासी, अंत्यज आणि बाह्य' म्हणजेच अस्पृश्य की काय याची निश्चिती करून घेण्यासाठी धर्मसूत्रे आणि स्मृती अनुपयुक्तच ठरत असतात.
मनुने सांगितलेले गट बाह्य लोकांचे कसे काय ? ते कोण आहेत ? ते काय काम करतात ? ते अस्पृश्य आहेत काय ? याचा उल्लेख मनूने केला आहे. प्रथमतः वैदिक व दस्यू असे दोन वर्ग पाडलेत. पुढे त्यांनी वैदिकांचे विभाजन करून चार गट पाडलेत. 1) चातुर्वण्याच्या चौकटीत असलेले, 2) चातुर्वण्याच्या चौकटी बाहेरचे, 3) व्रात्य आणि 4) पतित किंवा जाती बहिःष्कृत असे होत.

एखादी व्यक्ती चातुर्वण्याच्या चौकटीत आहे की नाही या प्रश्नाचा निर्णय त्यांच्या आई–वडिलांच्या निर्णयावरून घेण्यात येत होता. कारण त्या व्यक्तीचा जन्म मिश्र किंवा वर्णसंस्कारापासून झाला असेल तर तो चातुर्वणाच्या बाहेरचा समजला जात असे. त्यांच्यात मनू पुन्हा दोन गट करतो. अनुलोम आणि प्रतिलोम असे होत.[4]म्हणजेच अंत्य म्हणजे अस्पृश्य होय असे दर्शविणारा कोणताही पुरावा उपलब्ध नाही. जे लोक गावकुसाबाहेर राहत होते त्यांना दिलेले ते नाव होते. अनेक ऐतिहासिक पुराव्यांवरून अंत्यजांनाच अस्पृश्य मानण्यात येत होते हे आपण पुरेशा प्रमाणात खोडून काढू शकतो.

### अंत्यवासी कोण ?

अंत्यवासी हा शब्द दोन वेगवेगळ्या अर्थाने वापरण्यात येत होता. शिक्षणकाळात गुरुच्या घरी राहून विद्यार्जन करणाऱ्या ब्रह्मचाऱ्याचा पर्यायी शब्द म्हणून वापरण्यात येई. किंवा शेवटी भोजन करणाऱ्यालाही अंत्यवासी म्हटले जात असे. असे असले तरी या शब्दाच्या अर्थाचा संबंध अस्पृश्य या शब्दाशी पोहचू शकत नाही. ब्राह्मण, क्षत्रिय आणि वैश्यही जरी ब्रह्मचारी होऊ शकत होते तर ते अस्पृश्य कसे होवू शकतात.[5]

### चांडाळ स्पर्श आणि शुद्धीकरण

चांडाळ या शब्दाने कोणताही एकसंघ लोकांचा वर्ग सूचित होत नाही. लोकांच्या अनेक गटांना दिलेला तो एक शब्द असून ते परस्परांपासून पूर्णतः वेगवेगळे आहेत. चांडाळ या शब्दाची ढोबळमानाने व्याख्या करून त्यांचा स्पर्श झाल्यास शुद्धी करून घेणे मात्र आवश्यक असल्याचे गृहीत धरले तरी शुद्धीकरणांचे नियम हे शास्त्रांनी सांगितलेले होते. त्यानुसार बहिष्कृत व्यक्ती, चांडाळ, बाळंतण, अपवित्र स्त्री, रजस्वला स्त्री, प्रेत अशांना स्पर्श झाला तर वस्त्रांसह सचैल स्नान करून स्वतःस शुद्ध करून घ्यावे किंवा पाण्यामध्ये डोक्यासहीत बुडी मारावी. तसेच एखाद्या ब्राह्मण व्यक्तीचे चांडाळ, रजस्वला स्त्री, पतित, प्रसूता स्त्री, प्रेत यांना स्पर्श झाल्यास स्नान करून शुद्ध होत असतो.[6]

वास्तविक पवित्र–अपवित्र अशा अशास्त्रीय बाबींवर काथ्याकूट करून शास्त्रकारांनी आपल्या सोयीनुसार अर्थ सांगून केवळ स्पर्शाने अपवित्र होतो आणि स्नानाने शुद्ध होत असतो. अशा बाबी समाजात आणून कोणते हित साध्य होते, असा एक सामान्य कार्यकारणभाव दर्शविणारा प्रश्न चिकित्सक अभ्यासकाला पडतो. अपवित्र व अस्पृश्यता ह्या दोन्ही बाबी समान नव्हत्या.

## *शूद्र कोण होते ?*

प्रस्तुत विषयाच्या संदर्भात अभ्यास केला असता शूद्र हे अनार्य नव्हते, तर ते आर्य होते. परंतु त्यांची टोळी किंवा त्यांची जमात किंवा त्यांचा पंथही निराळा होता. असा निष्कर्ष काढणे शक्य होते अशी माहिती हिंदू धर्माच्या पवित्र वाङ्यामधून मिळते.

अथर्ववेदामध्ये याचा पुरावा मिळतो. तो असा की, 'मी देवामध्ये आवडता होईल असे कर, मी राजांमध्ये आवडता होईल असे कर, जो पाहतो मग तो शूद्र असो वा आर्य असो, त्या प्रत्येकाला मी आवडेल असे कर.[7]

तर वाजसनेयी संहितेत आम्हाला राजामध्ये तेज दे. आम्हाला ब्राह्मणांमध्ये तेज दे. आम्हाला वैश्यांमध्ये व शूद्रांमध्ये तेज दे. मला तेजात तेज मिळवून ते तेज दे. असा उल्लेख आढळतो.[8]

या संदर्भाचा आशय पाहिला तर शूद्र अनार्य नव्हते असेच सिद्ध होते. अनार्य नव्हते तर मग शूद्र हे आर्य होते असेच मत मान्य करावे लागते.

एकंदरीत अस्पृश्यतेचा उगम, उदय कधी झाला याविषयी निश्चित काही विधाने करता येत नाहीत. मात्र या देशात ब्रिटिशपूर्व काळात अस्पृश्यतेची अमानुष रुढी प्रचलित होत्या. गावकुसाबाहेर अस्पृश्यांच्या वस्त्या असल्या तरी ग्रामसंस्थेत त्यांना विशिष्ट स्थान होते. कारण ग्राम प्रशासनात अस्पृश्यांना महत्त्वाचे स्थान होते. असे असले तरी हिंदूच्या धार्मिक व सामूहिक स्थळांमध्ये मात्र अस्पृश्यांना प्रवेश नव्हता. त्यांचे सामाजिक स्थान हे संकुचित होते. त्यांच्या वाट्याला दैन्य, दरिद्री, लाचारीच आलेली होती. त्यांना सवर्ण समाजाच्या मर्जीने स्थैर्य व सुरक्षितता प्रदान केली जात असे.

इंग्रजी राजवटीत मात्र भारतीय सामाजिक जीवनात एक मूलगामी स्थित्यंतर घडून आले. माणसाला माणूस म्हणून काही निसर्गसिद्ध व मुलभूत असे अधिकार आहेत आणि त्यांचे रक्षण करणे हे शासनाचे आद्य कर्तव्य आहे या तत्त्वांवर ब्रिटिश कायदेपद्धतीची उभारणी असल्याने कायद्यान्वये सर्वांना समान अधिकार प्रदान करण्यात आलेत. असे असले तरी प्रस्थापित हिंदूकडून अस्पृश्यांवर बहिष्काराचे धोरण लादण्याचा प्रयत्नच होत राहीला. सार्वजनिक ठिकाणी, धर्मस्थळांमध्ये जर प्रवेश केला तर सवर्ण कोर्टामाफत मनाई हुकूम बजावून विरोध करीत.[9]

थोडक्यात ब्रिटिश राजवटीत मर्यादित क्षेत्रात का असेना पण दलितांना समानतेच्या तत्त्वांचा अनुभव आल्याने आपल्या हक्कांची त्यांना जाणीव होऊ लागली. मात्र या जाणिवेतून दलितांनी हक्क प्राप्तीचे प्रयत्न केले तर त्यांच्यावर सामुहिक बहिःष्कार टाकण्यात येत असत. ग्राम या स्वावलंबी घटकात मग दलितांची सर्वच बाजूने सामाजिक बरोबरच आर्थिक कोंडी होत असे. प्रसंगी सवर्णाकडून बळाचा वापरही होत असल्याने आहे तच जीवन स्वातंत्र्यापर्यंत जगावे लागले. स्वातंत्र्योत्तर काळात मात्र संविधानातून दलितांना मानवतेचा अधिकार मिळाल्याने त्यांची प्रागतिकतेच्या दिशेने वाटचाल सुरू होऊन मोठी प्रगती गाठली गेली. असे असले तरी या देशातून आणि समाजातून अस्पृश्यता पूर्णपणे नेस्तनाबूत झाली असे म्हणणे अतिधाडसाचेच ठरेल.

## *संदर्भसूची*

1) पंडित नलिनी, स्वातंत्र्योत्तर काळातील दलितांचा प्रश्न, साधना प्रकाशन, पुणे, पृ. 10,15.
2) खैरमोडे चांगदेव (अनु.), शूद्र पूर्वी कोण होते ?, सुधीर प्रकाशन, बोरगाव (मेघे), ता.जि.वर्धा, मार्च 2003, पृ. 29,34.
3) आचार्य प्रा. सुरेन्दकुमार (समीक्षक), मनुस्मृती, आर्य साहित्य प्रचार, ट्रस्ट, दिल्ली, 1958, पृ. 848, 851.
4) तत्रैव, पृ. 114, 116.
5) तत्रैव, पृ. 180, 182.
6) आंबेडकर डॉ. बाबासाहेब, अस्पृश्य मूळचे कोण आणि ते अस्पृश्य कसे बनले ?, सुधीर प्रकाशन, बोरगाव मेघे, ता.जि.वर्धा, 2000, पृ. 35, 36.
7) खरात एस., डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सहवासात, इनामदार बंधू प्रकाशन, पुणे, 1988, पृ.55.
8) मेश्राम केशव, डॉ. आंबेडकर चिंतन, प्रकाश विश्वासराव, मुंबई, 2006, पृ. 85.
9) कुबेर डॉ. वा. ना., डॉ. आंबेडकर विचारमंथन, सुगावा प्रकाशन, पुणे, तिसरी आवृत्ती, पृ. 62.



***प्रा. डॉ. सुजाता सुधीर गायकवाड***
विद्यावर्धिनी महाविद्यालय, धुळे.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- ✶ International Scientific Journal Consortium
- ✶ OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.aygrt.isrj.org